# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 15.12.2012 (का.प.क्र.20) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

शनिवार दिनांक 15.12.2012 (का.प.क्र.20) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.45 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त तथा उपआयुक्त (प्रशासन) श्री.रविंद्र निकम, विधी सहाय्यक तथा प्र.नगर सचिव, श्री.ओ.सी.शिरसाठ यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
02. स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
03. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
04. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
05. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
06. स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
07. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
08. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
09. स. श्रीमती निलाबाई देविदास जगताप

**चर्चा :**

श्री.बळासाहेब मुंडे :शहरात पाणीटंचाईचे दिवस आहे. गुंठेवारी भागात टँकरद्वारा पाणीपुरवठा करण्यात येत आहे. परंतु टँकरवर नियंत्रण व त्याचे नियोजन योग्य प्रकारे होत नाही. वार्ड ई साठी 28 टँकर आहे. एक टँकरद्वारा 8 फेऱ्या मारल्या जातात जयभवानी नगर ते एन-5 ची पाण्याची टाकी पर्यंतचे अंतर कमी आहे. टँकर कशापध्दतीने लावले आहे. त्यास बिल कशापध्दतीने दिले जाते. माहिती देण्यात यावी. नागरीकांना पिण्यासाठी पाणी नाही.

उपअभियंता (यांत्रिकी) :मनपाचे 11 आणि खाजगी तत्वावर 28 असे 39 टँकर पाणीपुरवठा करण्यासाठी आहे. वार्ड अ आणि ड करीता 10 टँकर वार्ड ब आणि क करीता 8 टँकर, वार्ड ई व फ करीता 21 टँकर दिलेले आहेत.

श्री.बळासाहेब मुंडे :ई व फ करीता 16 टँकर कार्यरत आहेत.

उपअभियंता (यांत्रिकी) :मनपाचे 4 आणि 17 खाजगी वार्ड इ करीता आहे. रोज 1570 रूपये आणि प्रत्येकी कि.मी. 20 रूपये 50 असे दर निश्चित केलेले आहे. साधारणत: दिवसभरातुन 8 ट्रिपकरने आवश्यक आहे. दिवसभरातील ट्रिपची नोंद रजिष्टरमध्ये करण्यात येते. टँकर वार्डात गेल्यावर ड्रम भरुन द्यावा लागतो.

मा.सभापती :टँकर कुठे भरण्यात येते.

उपअभियंता (यांत्रिकी) :एन-5 आणि कॉटला कॉलनी येथे. कॉटला कॉलनी येथुन 10 टँकरचे फिलींग होते. एका टँकरला फिलींग होण्यास 10 ते 15 मिनीट लागतात.

**मा.सभापती** :एका ठिकाणी टँकर उभा राहिल्यास अर्ध्या ते पाऊन तास टँकर निघत नाही. सर्व वाहनांचे कि.मी.चालू आहे का?

**उपअभियंता (यांत्रिकी)** :चालू आहे. कि.मी. बंद असल्यास अंतर मोजणी केलेली आहे. त्यासंबधी लिस्ट तयार करण्यात आलेली आहे. त्यानुसार मोजणी केली जाते.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :जयभवानी नगर ते एन-5 अंतर कमी आहे. टँकरला 8 ट्रिप म्हणजे अत्यंत कमी आहे कमीत कमी 15 ट्रिप होणे गरजेचे आहे. नागरीकांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे.

**उपअभियंता (यांत्रिकी)** :ॲव्हरेज कॅलक्युलेशन केलेले आहे. त्यानुसार देण्यात येते. प्रत्यक्ष जागेवर जाऊन तपासणी करून ट्रिप वाढविण्याबाबत माहिती घेण्यात येईल. आहे त्या टँकरमध्ये योग्य नियोजन करून टँकर वाढविण्यात येईल.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :पाणीपट्टी वाढविण्यात आलेली आहे नागरीक पैसे भरण्यास तयार आहे. परंतु पिण्याचे पाणी नागरीकांना देण्यात यावे.

**मा.सभापती** :नागरीकांना पाणी मिळायलाच हवे त्यासाठी प्रशासनाने योग्य नियंत्रण करायला हवे.

**उपअभियंता (यांत्रिकी)** :डिस्ट्रयुब्युशनचे काम वार्ड इंजिनिअर यांचे आहे.

**मा.सभापती** :प्रशासनाने वार्ड इंजिनियर, कार्यकारी अभियंता (पा.पू) आणि उपअभियंता (यांत्रिकी) टँकरचे नियोजन व नियंत्रण योग्य रितीने करण्यात यावे.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :नागरीकांच्या जिवनाशी खेळण्यात येवु नये. नागरीकांना पिण्याचे पाणी देण्यात यावे.

**मा.सभापती** :पिण्याचे पाण्याचे कुठल्याही प्रकारे तडजोड होणार नाही. प्रशासनाने विनंती केल्यानुसार दोन दिवसाआड पाण्यासाठी सर्वांनी सहकार्य केले. पाणी सर्वांना दिलेच पाहिजे.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :वार्डातील नागरीकांना 500 फुट पर्यंत पाईप टाकुन नळ कनेक्शन घेतलेले आहे. मनपाने त्या ठिकाणी पाईपलाईन टाकावी. जेनेकरून मनपाचा फायदा होईल. पाणी वाया जात आहे.

**मा.सभापती** :नियोजन कसे होईल.

**कार्यकारी अभियंता(श्री.कोल्हे)** :योग्य ते नियोजन करून समस्या सोडविण्यात येईल.

**उपअभियंता (यांत्रिकी)** :आहे त्या ट्रँकरमध्ये कशापध्दतीने नियोजन करता येईल ते करण्यत यईल.

**मा.सभापती** :मागणीनुसार वार्ड इंजिनिअर, कार्यकारी अभियंता (पापू), आणि उपअभियंता यांत्रिकी यांनी संयुक्त बैठक घेवुन योग्य रित्या नियोजन व नियंत्रण करण्यात यावे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :सिडको नाटयमंदिर, संत तुकाराम नाटयमंदिरात मंनोरंजनात्मक कार्यक्रम पार पाडत असतात त्यासाठी अनामत रक्कम घेतली जाते. परंतु कार्यक्रम झाल्यानंतर तीन तीन वर्ष होऊनही अनामत रक्कम संबधीतांना परत मिळत नाही. आर्थिक परिस्थीती मनपाची बरोबर नाही हे जरी बरोबर असलेतरी संबधीतांकडून वार्षीक कार्यक्रमाची/शोची फिस एकदास डिपॉसिट करून घेतल्यास महानगरपालिकेचा फायदा आहे. वन टाईम डिपॉझिट घेण्यात यावे

म्हणुन मागील बैठकीमध्ये रूलिंग देण्यात आली होती परंतु त्याची अंमलबजावणी झालेली नाही. या वास्तुंचे देखभाल दुरूस्तीकडे लक्ष दिले जात नाही. संत एकनाथ येथील सभा्गृहामधील 15 ते 20 खुर्च्या तुटलेल्या अवस्थेत आहे. तसेच संत तुकाराम येथील बाल्कनीतील सिलींगचा काही भाग पडलेल्या अवस्थेत आहे. संबधीत विभागाने या बाबतीत काय केलेले आहे खुलासा व्हावा.

मालमत्ता अधिकारी :दुरूस्तीबाबत वार्ड अभियंता यांना पत्र देण्यात आलेले आहे.

उपअभियंता (श्री.सिद्दीकी) :सिडको नाटयमंदिर येथील मेंन्टनेन्सचे काम लवकरच करण्यात येईल.सिलींगच्या कामाचा खर्च जास्त आहे. तसेच डिपॉसिटची रक्कम मेंन्टनेन्ससाठी ठेवल्यास अडचणी येणार नाही.

मा.सभापती :ज्या प्रमाणे सिव्हीलचे एक्सजमशन झालेले आहे. त्याच प्रमाणे वन टाईम डिपॉसिट घेण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

श्रीमती प्राजक्ता राजपुत :शिलाई मशिन वाटप केल्याबद्दल सर्व पदाधिकारी, स्थायी समितीचे सदस्य, सभापती अधिकारी आणि कर्मचारी यांचे धन्यवाद करण्यात येतो तसेच महिला बालकल्याणच्या ज्या योजना आहेत त्या तात्काळ कशा पध्दतीने कार्यन्वित करता येईल त्याकडे लक्ष देण्यात यावे. तसेच पावडर खरेदी करीता टेंडर काढलेले आहे का? खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त (म) :पावडर खरेदीसाठी मान्यता झाली असुन लवकरच वर्क ऑर्डर देणार आहे. शासनाच्या आरसीप्रमाणे खरेदी करण्याचा प्रस्ताव होता त्याप्रमाणे खरेदी करण्याचे आदेश देण्यात येत आहे. फिनेल आणि कार्बोलिक पावडरसाठी 10 लाखाची तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

मा.सभापती :आरसीमध्ये एजन्सीची नांवे असतात कोणती एजन्सी सलेक्ट केली आहे.

उपआयुक्त (म) :माहिती मागवुन सादर करण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रकल्प विभाग, सुवर्ण जंयती योजना मध्ये कार्यरत सात महिला कर्मचारी यांना मुदतवाढ न देता काढुन टाकलेले आहे. त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे. मुदतवाढ कोणी द्यायची आस्थापना विभागाने की सुवर्णजयंती योजना विभागाने मुदतवाढ द्यायची या वादामुळे संबधीत कर्मचारी यांचे नुकसान होत आहे. संबधीत विभागांनी आत्तापर्यंत मुदतवाढ का देण्यात आली नाही.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

प्रकल्प अधिकारी (सुजंयो) :प्रकल्प विभागामध्ये 7 समुह संघटिका करार पध्दतीवर कार्यरत आहेत. त्यांची मुदत 31 जुलै 2012 रोजी संपलेली आहे. रितसर प्रस्ताव आस्थापना विभागाकडे पाठविण्यात आला होता. तत्कालिन उपआयुक्त (म) यांनी रिमार्कस् देण्यात आले होता की, यानंतर प्रस्ताव प्रकल्प विभागानेच हाताळावे. परंतु विभाग प्रमुख उपआयुक्त (प्र) यांनी म्हटले आहे की, मागील 7 वर्षापासून मुदतवाढ व नियुक्ती आस्थापना विभागाने केलेली आहे. त्यानुषंगाने आस्थापना विभागाने कार्यवाही करावी म्हणुन

सांगीतलेले आहे. तत्कालिन उपआयुक्त महसूल यांनी नमुद केले आहे की, सदरील विभाग हा शासनाचा विभाग आहे. शासनाच्या विभागामार्फत हा विभाग चालतो. त्यांचे मुल्यांकन करून विभागाने रितसर मुदतवाढ द्यावी.

मा.सभापती :आपले स्वत:चे मत सांगण्यात यावे.

प्रकल्प अधिकारी (सुजंयो) :संचिका आल्यावर पुटअप करून पाठविण्यात येईल. प्रकल्प विभागातुन रितसर संचिका पुटअप व्हावी म्हणुन तत्कालिन उपआयुक्त यांनी सांगीतले आहे. पेमेंट शासनामार्फत होते. प्रकल्प विभाग मागील 5 ते 6 वर्षापासून सदर कर्मचाऱ्यांकडून काम करून घेत आहे.

मा.सभापती :आपण विभागात कार्यरत असल्यापासून नियुक्ती कशा प्रकारे झ ाली याची माहिती घ्यायला हवी होती.

प्रकल्प अधिकारी (सुजंयो) :कशा प्रकारे नियुक्ती झाली याबाबत माहिती संबधीत विभागास माहिती असल्याकारणाने सर्व डाटा त्यांचेकडे आहे.

मा.सभापती :उपआयुक्त (म) यांचेशी या संबधी चर्चा झालेली आहे का?

प्रकल्प अधिकारी (सुजंयो) :यासंबधी चर्चा झालेली आहे. त्यांचे म्हणण्यानुसार आमच्या विभागाकडून मुदतवाढ देता येणार नाही. विषय प्रकल्प विभागाचा आहे. त्यांनीच मुदतवाढ देण्यात यावी.

श्री.गिरजाराम हळनोर :संचिकेवर पुढील कार्यवाही करावी म्हणुन नोंद केलेली आहे. रिमार्क आहे माहिती देण्यात यावी. दोन विभागाच्या भांडणामुळे कर्मचाऱ्यांचे नुकसान होत आहे. आस्थापना विभागाने नियुक्त्या केल्यात. सर्व डाटा आस्थापना विभागाकडे आहे. गेल्या 6 वर्षापासून मुदतवाढ देण्यात येते आणि एकदम प्रकल्प विभागाकडुन मुदतवाढ देण्याबाबत सांगण्यात येते.

श्री.नारायण कुचे :लॉटरीवर 2 टक्के एलबीटी लावण्यात यावी म्हणून शासनाचे आदेश आहे. खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त (म) :वर्तमानपत्रामध्ये बातमी आलेली आहे की, लॉटरीवर 2 टक्के एलबीटी लागु आहे. जकात असतांना लॉटरी टिकीट, शासनाचे बॉन्ड, पोस्टातील टिकीट, साहित्य य सर्वांवर जकात नव्हती. एलबीटीचे शेडयुल तयार करतांना 86 वस्तुंना एक्साईझ टेरीफच्या शेडयुलमध्ये कन्व्हेट केले. 20 पानांचे शेडयुल 1000 पानांनमधे टर्न झालेले आहे. यानुसार 2 टक्के एलबीटी प्रींट होवुन आलेली आहे. सदरील बाब निदर्शनास आल्यावर संचिका सादर करण्यात आलेली आहे. लॉटरीसाठी येणारा कागद, प्रींट साहित्य त्यावर 2 टक्के एलबीटी लागु राहील परंतु ऑनलाईन लॉटरीवर एलबीटी राहणार नाही अशी माझी वैयक्तिक मत आहे. त्यानुसार संचिका पुटअप करून शासनाकडुन ते रद्द करण्यात यावे म्हणुन सांगण्यात आलेले आहे. 152 प्रमाणे शहरात आयात होणाऱ्या मालावरती एलबीटी आहे. आत्तापर्यंत लॉटरीवर एलबीटी आकारलेली नाही. शासनाच्या गॅझेटमध्ये लॉटरीवर एलबीटी आकरण्याबाबत उल्लेख आहे. मनपाकडुन दोन तीन वस्तुवर एलबीटीबाबत चुकून आलेले आहे.

श्री.नारायण कुचे :लॉटरी हा व्यवसाय आहे. लॉटरीवर एलबीटी आकारण्यात यावी.

मा.सभापती :शासनाने सांगीतल्यानुसार लॉटरीवर एलबीटी आकरण्यात यावी. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढले पाहिजे.

श्री.गिरजाराम हळनोर :शासनाचे पत्र महत्वाचे आहे की, अधिकारी यांचे वैयक्तिक मत महत्वाचे आहे.

मा.सभापती :दिड वर्षापासून लॉटरीवर एलबीटी लागू न केल्यामुळे मनपाचे नुकसान झालेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :शासनाने मंजूरी दिल्याप्रमाणे एलबीटी आकारणी करण्यात यावी. महानगरपालिकेचे हित महत्वाचे आहे.

मा.सभापती :अत्यावश्यक वस्तुंबाबत विचार करता येईल परंतु लॉटरी हा व्यवसाय आहे. एलबीटी लागू केल्यामुळे नागरीकांचे नुकसान होणार नाही.

उपआयुक्त (म) :कुठल्या रक्कमेवर एलबीटी लागू करायची हा प्रश्न आहे.

मा.सभापती :तात्काळ आजच्या आज लॉटरीवर एलबीटी वसुल करण्यात यावी.

उपआयुक्त (म) :सर्वांनी बसुन निर्णय घ्यावा लागेल टिकीटाची व्हॅल्यु की, त्यास मिळालेल्या बक्षीसावर एलबीटी वसुल करायची.

श्री.गिरजाराम हळनोर :पत्रकामध्ये काय आहे.

उपाआयुक्त (म) :लॉटरीवर दोन टक्के एलबीटी.

मा.सभापती :टेक्निकल भागाबाबत चर्चा करण्यात यावी. शासनाच्या जीआरनुसार सर्व वस्तुंवर एलबीटी आकारणी करण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :एलबीटी विभाग सर्वात मोठा उत्पन्नाचा स्त्रोत आहे. लॉटरीवर तात्काळ एलबीटी लावण्यात यावी. एखादे घर बांधायचे असेलतरी त्यास एलबीटी आकरली जाते. प्रशानाने टाऊन प्लॅनिंग विभागामध्येच एलबीटी आकारणी करण्याची व्यवस्था करण्यात यावी जेणे करून नागरीकांची टाऊन प्लॅनिंग कार्यालय, मनपा ते एलबीटी कार्यालय जकात नाका ही फेरी कमी होईल व तीथल्या तिथे एलबीटी भरण्याची सोय निर्माण होईल. एलबीटी विभागाचा एक कर्मचारी टाऊन प्लॅनिंग विभागात कार्यरत करून बांधकाम परवानगीसाठी येणाऱ्या नागरीकांना त्या ठिकाणी एलबीटी भरणाकरण्याची सोय निर्माण होईल. एलबीटी कक्ष अधिकारी यांचेवर कामाचा प्रचंड बोझा आहे. त्यांचेकडे दोन तीन विभागाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. उत्पन्न वाढीसाठी एलबीटी विभागात सक्षम स्कॉड निर्माण करण्यात यावा. त्यांनी रेड टाकली पाहिजे.

श्री.बाळासाहेब मुंडे :आजपर्यंत किती दंडात्मक कारवाई आकारण्यात आलेली आहे.

उपआयुक्त (म) :29 केसेसमध्ये 37 लाख रूपये दंडाच्या स्वरूपात आकरणी करण्यात आलेली आहे.

मा.सभापती :सर्व नाक्यांवर स्कॅनर लावण्यात यावे. उत्पन्न वाढीसाठी एलबीटी विभागात सक्षम स्कॉड निर्माण करण्यात यावे. त्यांनी नियंत्रण ठेवण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य :मोबाईलचे व्हाऊचर यावरही एलबीटी लावली पाहिजे.

मा.सभापती :50 टक्के शहरात प्रिपेडवर मोबाईल चालु आहे.

श्री.गिरजाराम हळनोर :एकाच अधिकाऱ्यावर कामाचा अधिकचा बोझा टाकलेला आहे. त्यांचेवरील बोझा कमी करण्यात यावा.

श्री.मोहन मेघावाले :हर्सुल टि पॉंईट, टि.व्ही.सेंटर येथील प्रशासनाने अतिक्रमण काढल्याबद्दल प्रशासनाचे व स्थायी समितीचे आभार व्यक्त करण्यात येतात. रस्त्याच्या दोन्ही बाजुकडील अतिक्रमण काढल्यामुळे तो भाग उद्वस्त दिसत आहे. सदरील रस्ता विकसीत करण्यात यावा. जेटींग मशीनवर किती कर्मचारी कार्यरत आहे माहिती देण्यात यावी.

उपअभियंता (यांत्रिकी) :जेटींग मशीनवर एक वाहन चालक व एक ऑपरेटर आवश्यक असतात. फिल्डवर आवश्यकतेनुसार कर्मचारी देण्यात येतात.

मा.सभापती :नादुरूस्त जेटींग मशीन त्वरीत दुरूस्त करण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

उपअभियंता (यांत्रिकी) :इस्टीमेट तयार झालेले आहे. लवकरच कार्यवाही करण्यात येईल.

श्री.बाळासाहेब मुंडे :नगरोत्थान योजनेतुन गुंठेवारी भाग वगळण्याबाबत वर्तमानपत्रात वाचण्यात आले. शहरात गुंठेवारीत 118 वसाहती आहेत.
खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :नगरोत्थान योजनेकरीता मा.खासदार श्री.चंद्रकांत खैरे साहेबांनी विशेष प्रयत्न केल्याबद्दल त्यांचे स्थायी समितीच्या वतीने अभिनंदन करण्यात येते. तसेच सदरील योजनेसाठी प्रशासनाने प्रयत्न केले त्यांचे सर्व स.पदाधिकारी, सर्व गटनेता, मा.आयुक्त यांनी सदर प्रोजेक्टकरीता एकजुटीने काम केल्यामुळे शासनाने यास मान्यता दिलेली आहे. सर्वाच्या प्रयत्नामुळे हे यश प्राप्त झालेले आहे. सर्वांचे अभिनंदन करण्यात येतो.

श्री.बाळासाहेब मुंडे :सर्वांच्या सहकार्याने नगरोत्थान योजनेला यश मिळालेले आहे. परंतु वर्तमानपत्रामध्ये गुंठेवारी वसाहतीबाबत ज्या बातम्या आलेल्या आहेत त्याबाबत खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता (पा/पू) :सदर योजनेकरीता गुंठेवारी वसाहतीस वगळून चालणार नाही. ड्रेनेज लाईन नैसर्गिक फ्लो असेलतरच टाकण्यात येतात. जर गुंठेवारी भागातुन लाईन जात असेल तर तिथुन लाईन टाकावीच लागणार. गुंठेवारी गल्लीतील नागरीकांनी गुंठेवारी भरलीच पाहिजे. गुंठेवारी भरली असेल तर तत्वतः सर्वांना मान्यच आहे. लाईन टाकण्यास काहीच हरकत नाही. या प्रकल्पामध्ये 544 रनिंग मिटरची लाईन गृहीत धरलेली आहे आणि 60 कि.मी.च्या मेन लाईन आहेत. 272 मीटर लाईन जशास तशे ठेवणार आहे. मोडकळीस आलेल्या लाईन बदलणार आहे. नविन भागातील ले आऊट मंजूर, गुंठेवारी भरली असेल तर गुंठेवारी भाग त्या ठिकाणी लाईन टाकण्यात येणार आहे. गुंठेवारी विभागाशी समन्वय ठेवुन काम करणार आहे.

मा.सभापती :पॉलिसी मॅटर म्हणुन ठराव येणाऱ्या मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात यावा.

कार्यकारी अभियंता (पा/पू) :सर्वसमावेशक प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात येणार आहे. कर्ज घेण्याची प्रक्रीया पुर्ण करावी लागणार आहे.

श्री.गिरजाराम हळनोर :पॉलिसी मॅटरबाबतीत प्रशासनाने पदाधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात यावी. वर्तमानपत्रामध्ये उलटसुलट बातम्या येतात. हे योग्य नाही.

मा.सभापती :प्रशासनाने भविष्यामध्ये याबाबतीत काळजी घेण्यात यावी.

श्री.विजेंद्र जाधव :वर्तमानपत्रामध्ये लेखा विभागाबाबत बातमी आलेली होती की, कर्मचाऱ्यांचे जीपीएफ,एलआयसीचे हप्ते 5 महिन्यांपासून मनपाने थकविलेले आहे ही अतिशय गंभिरबाब आहे. भविष्यात एखादी घटना घडली व हप्ते वेळेवर न गेल्यामुळे याबाबत जबाबदारी कुणाची, महानगरपालिका प्रशासन अडचणीमध्ये येवु शकते.

मुख्यलेखाधिकारी :आर्थिक नियोजना अभावी दोन चेक थकलेले आहेत. जीपीएफ,एलआयसीचे चेक नियोजन करून तात्काळ अदा करण्यात येईल.

मा.सभापती :यापुढे कर्मचाऱ्यांचे वेतन, जीपीएफ, एलआयसीचे हप्ते वेळेवर जातील याबाबत प्रशासनाने नियोजन करून प्रश्न सोडविण्यात यावा.

श्री.गिरजाराम हळनोर :शिवाजीनगर, मुकूंदवाडी या भागामध्ये मोठया प्रमाणात अतिक्रमण झालेले आहेत. या अतिक्रमणांकडे जाणुन बजून दुर्लक्ष केले जाते का? हा प्रश्न निर्माण होत आहे. अग्निशमन अधिकारी श्री.झनझन यांचेकडे अग्निशमन विभागाचा चार्ज आहे सदरील विभाग अतिशय संवेदनशील/तातडीचा आहे. त्यांचेकडे अतिक्रमण विभागाचा कार्यभार देण्यात येवु नये. शासनाने 4 मे 2006च्या शासन निर्णयानुसार अतिक्रमण विभाग नगर नियोजन विभागाकडे असावा. त्यामुळे दुसरे अधिकारी नेमण्याची गरज काय? अतिक्रमण अधिकारी टेक्निकल नसल्यामुळे अडचणी येताता. संचिका अभिप्रायसाठी नगर रचना विभागाकडे येते त्यानंतर प्रशासकीय विभाग, नगर रचना विभागाकडे अतिक्रमण विभागाचा चार्ज देण्यात यावा. हॉलडे कॅम्प, चिकलठाणा येथील अनाधिकृत इमारतीचे बांधकाम याबाबत बैठकींमध्ये नेहमी चर्चा होते. शासन निर्णयानुसार अतिक्रमण विभाग टाऊन प्लॅनिंगशी कनेक्ट करण्यात यावा. बांधकाम परवानगी त्या त्या भागातील उपअभियंता देतात, भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येते. तेच सांगू शकतात की, अतिक्रमण आहे किंवा नाही. टेक्निकल प्रॉब्लम टाऊन प्लॅनिंग विभाग सांगू शकतात. उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून अतिक्रमण विभागाचे काम करण्यात यावे.

श्री.नारायण कुचे :भोगवटा प्रमाणपत्राबाबत बैठकींमध्ये चर्चा झालेली आहेसिडक. वर्तमानपत्रामध्ये नगर रचना विभागाबाबत दररोज बातम्या येत आहे. संजय कासलीवाल यांना भोगवटा प्रमाणपत्र दिले त्याची शहानिशा करायली पाहिजे. प्रशासनाची जबाबदारी आहे. महानगरपालिकेची बदनामी होत आहे. कारवाई झाली पाहिजे. 50 टक्के शहरात बोगस बांधकाम चालू आहे.

श्री.विजेंद्र जाधव :तीन भोगवटा प्रमाणपत्राबाबत कारवाई करण्याचे प्रशासनाने मागील बैठकीत सांगीतले होते. खुलासा करण्यात यावी.

मा.प्र.आयुक्त :भोगवटा प्रमाणपत्राबाबतीत चौकशी समिती गठीत करण्यात

आलेली आहे. अद्यापपर्यंत अहवाल अप्राप्त आहे. अहवाल प्राप्त होताच मा.स्थायी समितीसमोर सादर करण्यात येईल.

मा.सभापती :समितीमध्ये सदस्य कोण आहेत.

मा.प्र.आयुक्त :समितीमध्ये महानगरपालिकेचे अधिकारी सदस्य म्हणून आहेत.

सहा.संचालक न.र. :समितीमध्ये मुख्य लेखापरिक्षक, सहा.संचालक न.र., उपआयुक्त (सिडको) श्री.झनझन आणि उपअभियंता श्री.काझी सदस्य आहेत.

श्री.नारायण कुचे :कासलीवाल यांना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आणि ते नंतर रद्द केले. प्रमाणपत्र कुणी दिले. जबाबदार कोण?

सहा.संचालक न.र. :संजय कासलीवाल यांना भोगवटा प्रमाणपत्र दिलेले नाही. इश्यु केलेले नाही. अटींची पुर्तता झालेली नसल्याने मा.आयुक्तांनी भोगवटा प्रमाणपत्र रद्द केले होते.

मा.सभापती :अतिक्रमणच्या संबधी टाउन प्लॅनिंग विभागासंबधी शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी.

श्री.विजेंद्र जाधव :चिकलठाणा प्रकरणात उपआयुक्त (प्र) यांचेवर जी कारवाई झाली. सभागृहास विनंती आहे की, मा.आयुक्तांना सभागृहातर्फे सांगुन महा-नगरपालिकेच्या नियमाप्रमाणे म्हणजेच 397 ख च्या कलमाप्रमाणे गुन्हा वापस घेता येतो. त्याबाबतीत संबधीत पोलीस स्टेशनला मा.आयुक्तांकडुन एक पत्र पाठविण्यात यावे. नोंदविलेला गुन्हा परत घेण्यात यावा.

श्री.नारायण कुचे :अनाधिकृत बांधकामाबाबत मा.न्यायालयात 5 तारखेला सुनावणी होती. प्रकरणात पुढे काय झाले. खुलासा करण्यात यावा. उपआयुक्त (प्रशासन) एकटे या प्रकरणात जबाबदार नव्हते. संचिकेशी संबधीत इतर अधिकारीही यास जबाबदार होते.

विधी सहाय्यक :चिकलठाणा प्रकरण मा.न्यायालयात 5 डिसेंबरला सुनावणीसाठी होते परंतु म्युनिसिपल कोर्ट सुट्टीवर असल्याने पुढील सुनावणी 19 डिसेंबर रोजी ठेवण्यात आलेली आहे. अंतिम सुनावणी 19 डिसेंबर रोजी होईल. जेष्ठ विधीज्ञ तसेच मी स्वतः सुनावणी दरम्यान उपस्थित राहुन हि बाब मा.-न्यायालयाच्या निदर्शनास आणुन दिलेली आहे की, स्थायी समितीमध्ये वरिष्ठ सभागृहामध्ये या प्रकरणाची चर्चा अतिशय गंभिरतेने होत आहे. मा.-न्यायालयाने याबाबतीत तात्काळ सुनावणी देऊन निर्णय द्यावा असे निवेदन केलेले आहे. मा.न्यायालयाने हि बाब लक्षात घेऊन 19 डिसेंबर 2012 रोजी सुनावणी ठेवलेली आहे. मा.न्यायालयाचा निर्णय प्राप्त होताच स.सभागृहास सविनय सादर केला जाईल.

श्री.गिरजाराम हळोर :स.सदस्य श्री.विजेंद्र जाधव यांनी जो मुद्दा मांडला तो अतिशय महत्वाचा मुद्दा आहे. अधिकाऱ्यांकडून काही चुकीचे काम होत असेल मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदीनुसार कार्यवाही अपेक्षित आहे. पोलीस स्टेशनमध्ये जाऊन गुन्हा नोंदविणे हे योग्य नाही. मा.आयुक्तांना याबाबतीत विनंती करण्यात यावी. पोलीस स्टेशनमध्ये जो गुन्हा दाखल केलेला आहे तो मागे घेण्यात यावा. मा.आयुक्तांना जी काही कार्यवाही करायची असेल ती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी-नुसार करावी.

मा.सभापती :मा.नगर सचिव यांनी मुं.प्रां.म.अ.1949 चे कलम 397 ख सभागृहास वाचुन दाखववावे.

**प्र.नगर सचिव** :(मा.सभापती यांनी निर्देशित केल्याप्रमाणे कलम 397 ख मधील तरतुद सभागृहास वाचून सविनय सादर करीत आहे)

अधिनियमातील जी दुरूस्ती झाली आहे. त्यात 397 ख खालील प्रमाणे आहे.

397 ख आयुक्तास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, कार्य सुरू करण्यापूर्वी किंवा सुरू केल्यानंतर, कलम 397 क याच्या पोट कलम खालील शिक्षायोग्य असलेला कोणताही अपराध आपसात मिटविता येईल.

(2) पोट-कलम (1) अन्वये जेव्हा एखादा अपराध आपसात मिटविण्याचा योग्य असेल तेव्हा, आपसात मिटविण्यात आलेल्या अपराधाच्या संबधात अपराधी व्यक्तीविरूध्द आणखी कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही आणि या कोणतीही कार्यवाही करण्यात आली असेल तर ती समाप्त होईल, आणि अशा अभिरक्षेत असेल तर, त्यास मुक्त करण्यात येईल. अशी तरतुद आहे.

**मा.सभापती** : 397 ख कलम वाचुन दाखविण्यात आलेला आहे. स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता मा.आयुक्तानी (प्रशासनाने) सदरील कलमांच्या अनुषंगाने सहानुभूतिपुर्वक विचार करून पोलीस स्टेशनमध्ये नोंदविण्यात आलेला उपआयुक्त (प्र) यांचे विरोधातील गुन्हा मागे घेण्याबाबत वरील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करावी.

श्री.मोहन मेघावाले :सलिम अली सरोवर येथील सौदर्यकरण करण्याचे कामाचे ॲग्रीमेंट किती दिवसांचे होते व सदरील कामाच्या स्थितीबाबत खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता (बीओटी) :सलिम अली सरोवर येथील काम अंतिम टप्प्यामध्ये आहे. कराराप्रमाणे कामाची मुदत संपलेली आहे. फाईन लावण्यात आलेला आहे. संबधीत कंत्राटदार यांचे नातेवाईक यांचे निधन झालेले असल्याने गेल्या महिण्यापासून काम बंद आहे. लवकरच काम सुरू होईल.

मा.सभापती :सदरील कामाची देखभाल दुरूस्ती कोण करणार आहे.

कार्यकारी अभियंता (बीओटी) :कामाची देखभाल दुरूस्ती बीओटीवर देण्याबाबत विचार सुरू आहे.

मा.सभापती :आऊसोर्सींगद्वारे काम करण्यात यावे. लवकरात लवकर निर्णय घेण्यात यावे.

कार्यकारी अभियंता (बीओटी) :याबाबतची संचिका पुटअप करणे चालू आहे.

श्री.विजेंद्र जाधव :सिध्दार्थ गार्डन येथील पार्कींगच्या कामाबाबत खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता (बीओटी) :इन्व्हलप नं.1 उघडण्यात आले आहे तांत्रिक समितीमार्फत छाननी चालू आहे. त्यानंतर इन्व्हलप नं.2 उघडण्यात येईल.

मा.सभापती :सलिम अली सरोवर येथील कामाचे आऊटसोर्सिंग कशा पध्दतीने करणार आहे माहिती देण्यात यावी. जपानीज गार्डनचे काम केव्हा होणार आहे.

कार्यकारी अभियंता (बीओटी) :फेज 2 मध्ये काम करण्यात येईल.

श्रीमती प्राजक्ता राजपुत :पावडर खरदीबाबत माहिती देण्यात यावी.

उपआयुक्त (म) :4 ऑक्टोबर 2012च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य, खादी ग्रामउद्योग मंडळ मुंबई यांना साबन फिनेल, पावडर यांचेकडुन खरेदी करण्यासाठी बाध्द केलेले आहे. त्यानुसार खरेदी आदेश दिलेले आहे. जीआरमध्ये एकच एजन्सी आहे.

मा.सभापती :यापेक्षा कमी रेटने मिळत असेलतर खरेदी करायचे की नाही. महानगरपालिकाचा फायदा होत असेल तर?

उपआयुक्त (म) :त्यासाठी निवीदा काढावी लागेल, शासनाच्या जी आर नुसार दर निश्चित केलेले आहे.

मा.सभापती :फंड कुणाचा आहे.

उपआयुक्त (म) :महानगरपालिकेचा फंड आहे.

मा.सभापती :महानगरपालिकेचा फंड असल्यामुळे महापालिका निवीदा काढण्यासाठी निर्णय घेऊ शकते. महानगरपालिकेच्या अटी शर्ती टाकण्यात याव्या. प्रशासनाने योग्य तो निर्णय घेण्यात यावा. महानगरपालिकेचा आरसीने किंवा निवीदेने फायदा होत असेल तो निर्णय घेण्यात यावा.

प्रकल्प संचालक (सुजंयो) :तत्कालिन उपआयुक्त (म) यांनी संचिकेवर शेरा दिलेला आहे की, उपआयुक्त प्रशासनाने प्रस्तावित केल्याप्रमाणे व विभाग प्रमुख यांनी सादर केल्यानुसार कर्मचाऱ्यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन दिनांक 01.09.2011 त 31.07.2012 पर्यंत मुदतवाढ देणेकामी सादर तसेच यापुढे संबधीत विभागाने कार्यवाही करणे योग्य. मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती :संचिकेवर आदेशित झालेले आहे.

प्रकल्प संचालक (सुजंयो) :आस्थापना विभागाकडून रिमार्कस् आलेला आहे.

मा.सभापती :योग्यरितीने काम करतात की नाही. सदरील विभाग 1 वर्षापासून कर्मचाऱ्यांकडून काम करून घेत आहे.

प्रकल्प संचालक (सुजंयो) :कामाचे मुल्यांकन करावे लागेल. काम व्यवस्थित आहे.

मा.सभापती :सदरील कर्मचाऱ्यांची गरज आहे की नाही

प्रकल्प संचालक (सुसंयो) :समूह संघटकाची महानगरपालिकेला 13 पदे मंजूर आहेत. 2 पदे मनपा आस्थापनेवर भरलेली आहेत. 9 पदे भरावयाची होती सन 2005मध्ये 7 पदे भरलेली आहेत. वैयक्तिक मत आहे की, शासनाचा याबाबतीत अभिप्राय घेण्यात यावा.

मा.सभापती :या अगोदर शासनाचा अभिप्राय घेतलेला आहे का?

प्रकल्प संचालक (सुजंयो) :या अगोदन मनपाने पदे भरलेली होती. त्यांनाच वारंवार मुदतवाढ देण्यात आलेली आहे. कर्मचारी योग्य काम करीत आहे.

मा.सभापती :आस्थापना विभागाने तात्काळ संचिका पुटअप करून 7 कर्मचारी यांना कामावर घेण्यात यावे.

विषय क्र. 100 :

मुख्य पशुसंवर्धन अधिकारी मनपा औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्री.सुभाष रामराव निरपगारे-मजुर, पशुसंवर्धन विभाग, कत्तलखाना पडेगाव येथे काम करणारे मनपा वर्ग-4 चे कर्मचारी त्यांचे राहते घरी आग लागुन 50 टक्के भाजले होते. सदर जळीत प्रकरणात आजारी असल्या कारणाने डॉ.बेंबडे प्लॅस्टीक कॉस्मेटीक बर्न अॅड हँड सर्जरी हॉस्पीटल औरंगाबाद येथे औषध उपचारावर रू.600091/- खर्च झालेला आहे. त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रूपये 86129/- वजा जाता अनुज्ञेय रक्कम रूपये 513962/- फक्त या रक्कमेच्या 90 टक्के रक्कम रूपये 4,62,566/- देय आहे. या देय रक्कमेतून 5 टक्के रक्कम रूपये 30,004/- मनपा फंडात जमा करणे आवश्यक आहे. सदर रक्कम वजा जाता उर्वरित रक्कम रूपये 4,32,562/- देय रक्कम मंजुर करणे योग्य. यापैकी वैद्यकीय खर्चापोटी संबंधीतास अग्रिम रक्कम रू.1,50,000/- देण्यात आले आहे. सदर रक्कम वजा जाता उर्वरित शिल्लक रक्कम रूपये 2,82,562/- औषधोपचारावरील खर्चा पोटी देणे योग्य. सदर प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.सुभाष रामराव निरपगारे-मजुर, पशुसंवर्धन विभाग, कत्तलखाना पडेगाव येथे काम करणारे मनपा वर्ग-4 चे कर्मचारी त्यांचे राहते घरी आग लागुन 50 टक्के भाजले असुन डॉ.बेंबडे प्लॅस्टीक कॉस्मेटीक बर्न अॅड हँड सर्जरी हॉस्पीटल औरंगाबाद येथे औषध उपचारावर रू.600091/- खर्च झालेला असुन त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रूपये 86129/- वजा जाता अनुज्ञेय रक्कम रूपये 513962/- फक्त या रक्कमेच्या 90 टक्के रक्कम रूपये 4,62,566/- देय आहे. या देय रक्कमेतून 5 टक्के रक्कम रूपये 30,004/- मनपा फंडात जमा करणे आवश्यक असुन सदर रक्कम वजा जाता उर्वरित रक्कम रूपये 4,32,562/- देय रक्कमेस तसेच यापैकी वैद्यकीय खर्चापोटी संबंधीतास अग्रिम रक्कम रू.1,50,000/- देण्यात आले असुन सदर रक्कम वजा जाता उर्वरित शिल्लक रक्कम रूपये 2,82,562/- औषधोपचारावरील खर्चा पोटी देणेस मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 101 :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील सादीया मार्केट व्यापारी संकुल येथील दुकान क्र. एस 15 व 16 भाडे तत्वावर मिळणे संबंधाने अर्जदार श्री.मोहम्मद युनूस खान यांनी विनंती केल्यानुसार प्रशासकीय मान्यता होऊन सदर दुकाने संबंधीतास भाडे तत्वावर देणे प्रस्तावित आहे. सदरील दुकाने या व्यापारी संकुलात मागील बाजूस आहेत. सदर दुकान यापुर्वी लिलावाने देण्यात आलेल्या व्यक्तीने ताब्यात घेतले नसल्याने रिक्त आहे. महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार सदर दुकान गाळयाचे भाडे या वर्षीचे शिघ्र गणकानुसार होणाऱ्या भाडे दराच्या दिडपट म्हणजे प्रति दुकान प्रति वर्ष रू.14,800/- याप्रमाणे भाडे होत आहे.

याशिवाय मालमत्ता कर, इतर कर तसेच सेवा शुल्क इत्यादीसह नेहमीच्या अटी शर्ती लागू राहतील. करीता संबंधीतचे मागणीनुसार सदर दुकानाकरीता प्रत्येकी भाडे रू.14,800/- प्रति वर्ष निश्चित करून प्रथम तीन वर्षाचे कालावधीकरीता दुकानाचे नेहमी इतर अटी/ शर्तीस अधिन राहुन दुकान भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

संवाद :

श्री.गिरजाराम हळनोर :वर्तमानपत्रामध्ये बातमी आलेली आहे की, बाजार समिती निविदा न मागवता गाळे भाडयाने दिलेले आहे आणि त्यांचेवर कारवाई झोलेली आहे. प्रशासनाने विषय पत्रिकेवरील भाडयाने देण्यासंदर्भातील विषय/ प्रस्ताव नियमानुसार ठेवलेले आहे का? हे तपासण्यात यावे आणि भाडयाने देण्यात यावे.

श्री.बाळासाहेब मुंडे :गाळे देण्याबाबत जाहिरात देवुन निवीदा का काढण्यात येत नाही.

मा.सभापती :स्थायी समितीने निर्णय घेतलेला आहे की, ज्यांनी ज्यांनी मागणी केली असेल त्यांना भाडयाने देण्यात यावे. पुर्वी महानगरपालिकेच्या ताब्यातील गाळयांना भाडयाने घेण्याबाबत प्रतिसाद मिळत नव्हता. पुर्वी निविदा काढल्या होत्या परंतु त्यास कुणी प्रतिसाद दिला नाही.

श्री.गिरजाराम हळनोर :निवीदा काढुन भाडयाने देण्यात यावे.

मा.सभापती :विषय क्रमांक 101 निवीदा काढण्यात यावे.

ठराव :

प्रस्तुत प्रस्तावासंबंधी निविदा काढण्यांत याव्या, असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. 102 :

मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला मोतीकारंजा येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील बीफ मार्केटमधील गाळा क्र. (4) संबंधाने अर्जदार श्री.शेख खलील शे.रफिक यांनी मागणी केली आहे. संबंधीताचे मागणी संबंधाने उक्त भाडे आकारणी नुसार त्याप्रमाणे वार्षिक भाडे रक्कम रू.14,800/- ने गाळा भाडे तत्वावर देण्यास प्रशासकीय मान्यता झाली आहे. सदर दुकानाचे क्षेत्र 5.0 चौ.मी. एवढे आहे. सदर गाळयांचे वार्षिक भाडे रू.14,800/- एवढे होते. याशिवाय मालमत्ता कर, इतर कर तसेच सेवा शुल्क इत्यादीसह नेहमीच्या अटी शर्ती लागू राहतील. करीता मागणीनुसार सदर दुकानाकरीता वार्षिक भाडे रू.14,800/- निश्चित करून तीन वर्षाचे कालावधीसाठी नेहमीच्या इतर अटी/शर्तीस अधीन राहून सदर दुकान भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला मोतीकारंजा येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील बीफ मार्केटमधील गाळा क्र. (4) दुकानाचे क्षेत्र 5.0 चौ.मी. अर्जदार श्री.शेख खलील शे.रफिक यांना वार्षिक भाडे रू.14,800/- आकारणी करून देणेस व याशिवाय मालमत्ता कर, इतर कर तसेच सेवा शुल्क इत्यादीसह नेहमीच्या अटी शर्तीस अधीन राहुन तीन वर्षाचे कालावधीसाठी भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 103 :

मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला बन्सीलालनगर येथील महानगरपालिका शाळेच्या परिसरालगत असलेल्या महानगरपालिकेच्या मालकी हक्क व ताब्यातील एक खोलीचे क्षेत्र इत्यादी भाडे तत्वावर मिळणेबाबत चैतन्य मित्रमंडळ, बन्सीलालनगर, औरंगाबाद या संस्थेने मागणी केलेली आहे. चर्चा सत्र, भाषणे, सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक,धार्मिक, आरोग्य विषयक उपक्रम इत्यादी या संस्थेचे प्रमुख उद्देश आहे. यासाठी जागा मिळावी म्हणुन संस्थेची मागणी आहे. या ठिकाणी नमुद केल्यानुसार 100 चौ. फुट क्षेत्राचे बांधकाम केलेली एक खोलीचे क्षेत्र

उपलब्ध आहे. यासाठी या वर्षाच्या सिध्द शिघ्र गणकानुसार या जागेकरीता प्रतीमाह भाडे रक्कम रू.1150/- एवढे होते. (याशिवाय अनामत रक्कम, मालमत्ता कर, सेवाकर इत्यादी वेगळे राहतील.) सदर संस्थेची मागणी विचारात घेऊन सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता झालेली आहे.

करीता महानगरपालिकेच्या या जागेकरीता वर नमुद केलेनुसार रू.1150/- प्रतीमाह भाडे आकारून त्यासह नेहमीच्या अटी/शर्तीनुसार 3 वर्षासाठी सदर जागा संस्थेस भाडे तत्वावर देणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : निश्चित केलेले जे भाडे दिलेले आहे ते एकाच खोलीचे आहे. प्रतिमाहच्या ऐवजी प्रतिवर्ष करण्यांत यावे.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला बन्सीलालनगर येथील महानगरपालिका शाळेच्या परिसरालगत असलेल्या महानगरपालिकेच्या मालकी हक्क व ताब्यातील एक खोलीचे क्षेत्र इत्यादी भाडे तत्वावर मिळणेबाबत चैतन्य मित्रमंडळ, बन्सीलालनगर, औरंगाबाद या संस्थेने मागणी केल्यानुसार सदरील संस्था सेवाभावी असल्यामुळे, निश्चित केलेले भाडे र.रू.1150/- प्रतिमाह ऐवजी र.रू.1150/- प्रतिवर्ष भाडे आकारणी करून व याशिवाय अनामत रक्कम, मालमत्ता कर, सेवाकर इत्यादीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>विषय क्र. 104 :</u>

मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मोहल्ला पहाडसिंगपुरा परीसरातील स.नं.45/4 व 42/4 या संभाजीनगर गृहनिर्माण संस्था मधील महानगरपालिकेचे मालकीचे व ताब्यातील व मंजुर रेखाकंनातील खुल्या जागेत बांधलेली व्यायामशाळा भाडेतत्वावर मिळणेबाबत साधना आयडीयल मल्टी एज्युकेशन सोसायटी या संस्थेने भाडे तत्वावर मिळणेसाठी मागणी केलेली आहे. सदरील संस्थेचे प्रमुख उद्देश क्रिडा व्यायाम याची आवड निर्माण करण्यासाठी व्यायामशाळा व क्रिडांगणे खेळाडुंना उपलब्ध करून देणेसाठी प्रयत्न करणे इत्यादी आहेत. सदर व्यायामशाळेचे बांधिव क्षेत्रफळ 108 चौ.मी. एवढे असून त्याचे सिध्द शिघ्र गणकानुसारचे अपेक्षित मासिक भाडे रू.22,600/- एवढे होते. याशिवाय अनामत रक्कम, मालमत्ता कर, सेवाकर इत्यादी वेगळे राहील. त्या अनुषंगाने सदरील संस्थेस प्रथम तीन वर्षाचे कालावधीकरीता वर नमुद व्यायामशाळा भाडे तत्वावर देणेसाठी प्रशासकीय मान्यता झालेली आहे. करीता महानगरपालिकेच्या नेहमीच्या अटी / शर्तीनुसार सदर व्यायामशाळा संस्थेस भाडे तत्वावर देणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला पहाडसिंगपुरा परीसरातील स.नं.45/4 व 42/4 या संभाजीनगर गृहनिर्माण संस्था मधील महानगरपालिकेचे मालकीचे व ताब्यातील व मंजुर रेखाकंनातील खुल्या जागेत बांधलेली व्यायामशाळा भाडेतत्वावर साधना आयडीयल मल्टी एज्युकेशन सोसायटी या संस्थेस मासिक भाडे रू.22,600/- याशिवाय अनामत रक्कम, मालमत्ता कर, सेवाकर इत्यादी वेगळे राहील या व महानगरपालिकेच्या अटी /शर्तीनुसार तीन वर्षाच्या कालावधीकरीता महानगरपालिकेच्या नियमानुसार भाडे तत्वावर देण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>विषय क्र. 105 :</u>

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला उस्मानपुरा येथील जुन्या पोलीस चौकीमागील सभागृह हॉल स्पोर्टस् क्लब सार्वजनिक वाचनालय, सांस्कृतिक कार्यक्रम, व्यावसायिक प्रशिक्षण इत्यादीसाठी भाडे तत्वावर मिळावा म्हणुन फ्रेंडस् चॅरिटेबल वेलफेअर ट्रस्ट, औरंगाबाद या संस्थेने मागणी केली आहे. या संदर्भाने या संस्थेस सदर हॉल तीस वर्षासाठी नियमाप्रमाणे भाडे तत्वावर देण्यात यावे म्हणुन मा.सर्वसाधारण सभेने दि.09/08/2012 विषय क्र.849 ने अशासकीय ठराव

मंजूर केला आहे. सदर हॉलचे तळमजला +1 असे बांधकाम असून एकुण बांधकाम क्षेत्र 346.54 चौ.मी. एवढे आहे. सदर हॉल सध्या बहुउद्देशीय वापराकरीता स्थानिक नागरीकांना मागणीनुसार लग्न व इतर कार्यक्रमाकरीता भाड्याने देण्यात येतो. तथापी हॉलचा फारसा वापर होत नाही. करीता संस्थेस संस्थेची मागणी व वर नमुद मा.सर्वसाधारण सभेचा मंजुर ठराव या संबंधाने सदर मंजुर ठराव अंमलबजावणीच्यादृष्टीने या वर्षाचे आर.आर. आधारे या सभागृहाकरीता मासिक भाडे रू.55,200/- प्रतिमाह प्रमाणे भाडे आकारणी करण्यासह महानगरपालिकेच्या नेहमीच्या अटी शर्तीनुसार सदर सभागृह भाडे तत्वावर देणे बाबत प्रशासकीय मान्यता झाली आहे. करीता प्रस्तावित केल्यानुसार उक्त संस्थेस सभागृह / हॉल तीन वर्षाकरीता भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

चर्चा :

श्री.रेणुकादास वैद्य :सेवाभावी संस्थेने मागणी केलेली आहे. सदरील भाडे संस्था भरू शकणार नाही. इतर सभागृह ज्या पध्दतीने भाडयाने दिलेले आहे त्या पध्दतीने कमीत कमी भाडेतत्वावर देण्यात येवुन मंजूरी देण्यात यावी.

मा.सभापती :फ्रेंडस् चॅरिटेबल वेलफेअर ट्रस्ट, यांना सभागृहाच्या भाडयाबाबत त्यांचेशी वाटाघाटी करून निर्णय घेण्यात यावा.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला उस्मानपुरा येथील जुन्या पोलीस चौकीमागील सभागृह हॉल भाडे तत्वावर फ्रेंडस् चॅरिटेबल वेलफेअर ट्रस्ट, औरंगाबाद यांचेशी नियमाप्रमाणे वाटाघाटी करण्यास व महानगरपालिकेच्या अटी शर्तीनुसार भाडे दर निश्चित करण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 106 :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौ.गारखेडा येथील नुपुर अपार्टमेंट लगत / शेजारी औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील व्यापारी संकुलामधील दुकान क्रमांक 1 भाडे तत्वावर मिळणे संबंधाने अर्जदार श्री.ॲड.जनार्धन एम.मुरकुटे यांनी केलेल्या मागणी व विनंती नुसार दुकान संबंधीतास देणे बाबत मान्यता झाली आहे. सदर दुकान निविदा पध्दतीने देण्याच्या कार्यवाहीत निविदाधारकाने दरमहा रूपये 2117/- चा दर भरला होता. मान्यता झाल्यानंतर भाडे भरणा करून जागा ताब्यात न घेतल्याने सदर दुकान रद्द करण्यात आले व सध्या सदर दुकान रिक्त आहे. करीता संबंधीताची मागणी व विनंती संबंधाने सदर दुकानाकरीता आर. आर. ने होणाऱ्या भाडे दराच्या दिडपट भाडेदराने म्हणजे रक्कम रूपये 3000/- प्रति माह भाडे आकारून इतर नेहमीच्या अटी / शर्तीस अधीन राहुन प्रथम तीन वर्षाच्या कालावधी करीता अर्जदार श्री.ॲड. जनार्धन एम मुरकुटे यांना भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

याशिवाय मालमत्ता कर, इतर कर तसेच सेवाशुल्क इत्यादीसह नेहमीच्या अटी / शर्ती लागु राहतील करीता मागणीनुसार सदर दुकानाकरीता भाडे रूपये 3000/- प्रति माह निश्चित करून नेहमीच्या इतर अटी / शर्तीस अधीन राहुन प्रथम तीन वर्षाच्या कालावधीकरीता दुकान भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौ.गारखेडा येथील नुपुर अपार्टमेंट लगत / शेजारी औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील व्यापारी संकुलामधील दुकान क्रमांक 1 निविदा पध्दतीने देण्याच्या कार्यवाहीत निविदाधारकाने दरमहा रूपये 2117/- चा दर भरला होता, तथापी मान्यता झाल्यानंतर भाडे भरणा करून जागा ताब्यात न घेतल्याने सदर दुकान रद्द करण्यात आले व सध्या सदर दुकान रिक्त असल्यामुळे, सदरील दुकान भाडे तत्वावर मिळणे

संबंधाने अर्जदार श्री.ॲड.जनार्धन एम.मुरकुटे यांनी केलेल्या मागणी व विनंती नुसार सदर दुकान संबंधीतास रक्कम रूपये 3000/- प्रति माह भाडे आकारून इतर नेहमीच्या अटी / शर्तीस अधीन राहुन प्रथम तीन वर्षाच्या कालावधी करीता देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>ऐनवेळचे विषय</u>

<u>विषय क्र. 107 :</u>

मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला एन-12 हडको येथील धन्नुलाल मेघावाले हॉल तुळजाभवानी बहुउद्देशीय प्रतिष्ठान या संस्थेने भाडे तत्वावर मिळणे बाबत मागणी केलेली आहे.

तुळजाभवानी बहुउद्देशिय प्रतिष्ठान ही संस्था एन-12 येथील स्थानिक संस्था असून धर्मादाय सहआयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचेकडे नोंदणी केलेली आहे. सदरील संस्थेने संस्थेच्या विविध उपक्रम व ध्येय उद्देशानुसार कार्य करण्यासाठी सदर सभागृहाची मागणी केली आहे. सदरील हॉलचे बांधकाम सदर हॉलचा वापर फक्त शालेय कारणासाठी असे नमूद करून केलेले आहे. त्यानुसार सदर हॉलचा वापर फक्त शालेय कारणासाठीच्या वापरासाठी देय राहील. सदरील हॉलचे GF+1 असे बांधकाम असून एकत्रित बांधकाम क्षेत्रफळ 587.91 चौ.मी. एवढे आहे. सदर हॉलचे बांधकाम फेब्रुवारी 2010 मध्ये पूर्ण झालेले आहे. सदरील हॉल सिडकोने महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेल्या जागेत बांधलेला आहे. संस्थेची मागणी व हॉलचा वापर इ. मुद्दे लक्षात घेता सदर हॉल भाडे तत्वावर देण्याच्यादृष्टीने या वर्षीचे सिध्द शिघ्र गणकानुसारच्या दरआधारे मासिक भाडे रक्कम रू.67,200/- प्रतिमाह होते.

तसेच सदरील भाडे आकारून याशिवाय इतर कर, सेवाशुल्क व इतर अटी/शर्तीस अधीन राहून सदरील हॉल हा तुळजाभवानी बहुउद्देशिय प्रतिष्ठान यांना शालेय कारणासाठीच्या वापर करणेसाठी रू.67,200/- प्रतिमाह प्रमाणे भाडे आकारून तीन वर्षाकरीता भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

<u>संवाद :</u>

| | |
|---|---|
| मा.सभापती | : एन-12 येथील हॉल आहे, त्याचे भाडे 67200/- लावण्यात आलेले आहे ते जास्त भाडे लावण्यात आलेले आहे. |
| श्री.मोहन मेघावाले | : सामाजिक कामाकरीता सदरील हॉल भाड्याने पाहिजे. कमीत कमी भाडे कसे आकारता येईल ते आकारून भाडे तत्वावर देण्यात यावे. तसेच सदरील संस्थेस 30 वर्षासाठी भाड्याने करण्यात यावे. |
| श्री.गिरजाराम हळनोर | : सेवाभावी संस्था आहे, त्यास 30 वर्षासाठी देण्यास काही हरकत नाही. |
| सहा.संचालक न.र. | : रेडी रेकनरपेक्षा कमी दराने दिले आणि 30 वर्षासाठी दिल्यास तो पायंडा पडेल, रेडी रेकनरपेक्षा किती कमी करता येईल. ते संस्थेला प्रत्यक्ष बोलावुन त्यांचे काम बघुन मा.आयुक्त निर्णय घेतील. 30 वर्षासाठी देणे शक्य नाही. जास्तीत जास्त 5 वर्षासाठी देता येईल. |
| मा.सभापती | : सेवाभावी संस्था आहे. संबंधीताशी चर्चा करून कमीत कमी भाडे आकारणी तसेच कालावधी वाढविणे संबंधी प्रशासनाने निर्णय घ्यावा. |

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला एन-12 हडको येथील धन्नुलाल मेघावाले हॉल तुळजाभवानी बहुउद्देशीय प्रतिष्ठान या नोंदणीकृत संस्थेने भाडे तत्वावर मिळणे बाबत मागणी केल्यानुसार व सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे संस्थेच्या विविध उपक्रम व ध्येय उद्देशानुसार कार्य करण्यासाठी, संबंधीत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून कमीत कमी भाडे आकारणी तसेच कालावधी वाढविणे संबंधी प्रशासनाने निर्णय घ्यावा असे सर्वानुमते ठरले. त्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>विषय क्र. 108 :</u>

**कार्यकारी अभियंता (वॉर्ड इ/फ) विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, हिराखान अपार्टमेंट येथे पावसाचे पाणी वाहून जाणेसाठी स्ट्रॉम वॉटर पाईपलाईन टाकणेच्या कामांसाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.26,62,171/- चे अंदाजपत्रकास मा.आयुक्तांची मान्यता प्राप्त झाली असून या कामासाठी दिनांक 25/9/2012 रोजी निविदा मागविण्यात आल्या असता मे.बिल्डवेल कंस्ट्रक्शन यांची एक निविदा प्राप्त झाली असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 12.99% जास्त दराची आहे. संबंधीत गुत्तेदारास दराच्या वाटाघाटीसाठी बोलावले असता वाटाघाटीअंती अं.प.दरापेक्षा 5% जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविली आहे.**

**करीता प्राप्त निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीप्रमाणे सदरील काम मे.बिल्डवेल कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प.दरापेक्षा 5% जास्त दराने करून घेण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हिराखान अपार्टमेंट येथे पावसाचे पाणी वाहून जाणेसाठी स्ट्रॉम वॉटर पाईपलाईन टाकणेच्या कामांसाठी प्राप्त झालेल्या निविदानुसार, निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम मे.बिल्ड वेल कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प.दरापेक्षा 5% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**नगर सचिव**
**महानगरपालिका औरंगाबाद**